# जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : **chandrapur.rdc@gmail.com** फोन क्रमांक - 07172-250659
क्रं.कावि/आ.व्य/कोरोना विषाणु/2020/ 541 दिनांक :-05 जुन, 2020

---

**संदर्भ :-** 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,कलम 34 (C) 34 (M)

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनिमय 1897,

3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई-32 यांची दि.13 मार्च,2020 ची अधिसुचना

4. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र.40-3/2020-DM-I(A) दि.01.05.2020

5. महाराष्ट्र शासन महुसल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020

6. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र.40-3/2020-DM-I(A) दि.17.05.2020, दि. 30.05.2020.

7. महाराष्ट्र शासन महुसल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि.17.05.2020 व दि. 19.05.2020, दि. 31.05.2020.

8.उपविभागीय अधिकारी, चिमुर यांचे पत्र क्रं. कावि/कलि/प्रस्तु-3//646 दि. 21.05.2020.

9. या कार्यालयाचे आदेश क्रं.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/494 दि. 21.05.2020.

10. उपविभागीय अधिकारी, चिमुर यांचे पत्र क्रं. कावि/कलि/प्रस्तु-3/570 दि. 04.06.2020.

## -: आदेश :-

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 13 मार्च, 2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2, 3, व 4, ची अंमलबजावणी अधिसूचनेच्या दिनांकापासुन लागू करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी केंद्र शासन व राज्य शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन दिनांक 30 जुन, 2020 पावेतो संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन लागू राहील असा आदेश करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी **मौजा विरव्हा जुना ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर** या भागात कोरोना बाधीत रुग्ण आढळून आल्याने व त्याचा प्रादुर्भाव गावातील इतर भागात पसरु नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच प्रभागातील नागरीकांचे हित व सुरक्षेस्तव अधिकची उपाय योजना तातडीने करणे आवश्यक होते.

आणि ज्याअर्थी भारत सरकार आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी Novel Coronavirus Disease 2019 (COVID-19) बाबत Containment Plan निर्धारित केला असून त्यानुसार कोरोना विषाणुव्दारे बाधीत व्यक्ती/ समुदायच्या केंद्रबिंदु परिसरापर्यंत नागरीकांची हालचाल/फिरणे/संपर्क यावर निर्बंध घालून मज्जाव करणेबाबत निर्देशीत केलेले होते.

आणि ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम 34 (C) व 34 (M) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) व 144 (3) अंतर्गत **मौजा विरव्हा जुना, इटोली, पेठगाव, चक सरडपार, पेठगाव, बाम्हणी माल, बाम्हणी चक ता. सिंदेवाही जिल्हा चंद्रपूर** येथील इतर भागात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टीने या कार्यालयाचे संदर्भिय क्रं. 09 वरील आदेशान्वये सदर भागाच्या सिमा बंद करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे.

त्याअर्थी संदर्भिय क्रं. 10 वरील उपविभागीय अधिकारी , चिमुर यांनी **मौजा विरव्हा जुना, इटोली, पेठगाव, चक सरडपार, पेठगाव, बाम्हणी माल, बाम्हणी चक ता. सिंदेवाही जिल्हा चंद्रपूर** या भागात आरोग्य विभागातर्फे आवश्यक वैद्यकीय सर्व्हेक्षण पुर्ण करण्यात आले असुन कोणतेही नविन रुग्ण आढळुन आले नसल्याबाबत सादर केलेल्या अहवालानुसार या कार्यालयाकडील संदर्भिय क्रं. 9 वरील आदेशान्वये **मौजा विरव्हा जुना, इटोली, पेठगाव, चक सरडपार, पेठगाव, बाम्हणी माल, बाम्हणी चक ता. सिंदेवाही जिल्हा चंद्रपूर** या भागातील प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्राच्या सीमा याव्दारे पुर्ववत सुरु करण्यास काहीही हरकत नाही अशी माझी खात्री झालेली आहे.

आणि त्याअर्थी **मौजा विरव्हा जुना, इटोली, पेठगाव, चक सरडपार, पेठगाव, बाम्हणी माल, बाम्हणी चक ता. सिंदेवाही जिल्हा चंद्रपूर** या भागातील प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्राच्या सीमा या आदेशान्वये पुर्ववत सुरु करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

(डॉ.कुणाल खेमनार)
जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. चंद्रपूर
4. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
5. उपविभागीय अधिकारी, चिमुर
6. उपविभागीय पोलीस अधिकारी, चिमुर
7. तहसिलदार, सिंदेवाही

जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर